| | |
|---|---|
| **Headline:** NSE supports rehabilitation of differently abled underprivileged children with Project Chunauti | |
| **Source:** Loksatta | **Date:** 26 October 2017 |

# ‘प्रोजेक्ट चुनौती’बरोबर एनएसईच्या भागीदारीत विस्तार

**मुंबई :** गतिमंद आणि अनाथ असलेल्या मुलांना शिक्षण आणि किमान जीवन कौशल्यांच्या प्रशिक्षणातून पायावर उभे करण्यास मदत करणाऱ्या ‘प्रोजेक्ट चुनौती’ या स्वयंसेवी उपक्रमाबरोबर गेल्या अडीच वर्षापासून सुरू असलेले सख्य आणखी पाच वर्षांनी वाढविण्याची घोषणा राष्ट्रीय शेअर बाजार अर्थात एनएसईने केली आहे.

मुंबईत मूळ धरलेल्या या उपक्रमाची महाराष्ट्राच्या अन्य शहरात, तसेच नवी दिल्ली, झारखंड, कर्नाटक आणि केरळ अशा अन्य ठिकाणी पुनःस्थापनेचा उभयतांकडून संकल्प सोडण्यात आला आहे. अधिकाधिक मुलांपर्यंत हा उपक्रम पोहचविला जाणार आहे.